2018-19

40
2019


Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

330



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned by TapScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १३. सामाजिक चळवळ संकल्पना व वैशिष्ट्ये

**प्रा. डॉ. मेघराज रामहरी शिंदे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा.

**प्रस्तावना**

सामाजिक चळवळी अधिक संघटित असतात. कोणत्या तरी उद्देशाने चळवळी निर्माण होत असतात. चळवळीत सहभागी झालेले लोक उत्स्फूर्तपणे सहभागी झालेले असतात. त्यांच्या मनात काही प्रश्न असतात. ते प्रश्न सोडविण्यासाठी हे लोक एकत्र आलेले असतात सामाजिक चळवळीला कोणत्याही संघटनेची गरज नसते. लोक एखाद्या प्रश्नावर एकत्र येतात. त्यानंतर संघटन तयार होत असते. औद्योगिक समाजात सामाजिक चळवळी जास्त प्रमाणात आढळुन येतात. लोकशाही समाजव्यवस्थेत सामाजिक चळवळीचे प्रमाण जास्त असते. कारण लोकशाहीत व औद्योगिक समाजात हितसंबंधी गट असतात. हे गट समाजातील लोकांना संघटित करित असतात. व्यवस्थेला विरोध करित असतात. हुकुमशाही राज्यव्यवस्थेत सामाजिक चळवळी दडपण्याचा प्रयत्न केला जातो. सामाजिक चळवळी नष्ट केल्या जातात. असे असले तरी देखिल. हुकुमशाहीला विरोध करण्यासाठी लोक एकत्र येतात. व व्यवस्थेला उलथुन टाकण्याचा प्रयत्न करतात. लोकशाहीत मात्र सामाजिक चळवळीला प्रोत्साहन दिले जाते.

भारतात सामाजिक चळवळीची सुरुवात ब्रिटिश काळापासुन झाली. याच काळात शिक्षणाचा प्रसार झाला. भारतीय लोकांना पाश्चात्य विचारसरणीची ओळख झाली. समता स्वातंत्र्य व बंधुता या विचाराचा प्रभाव लोकांवर पडला त्यामुळे लोकांना कर्मकांडा विषयी जाणिव झाली. लोक त्यामधुन बाहेर पडण्याचा प्रयत्न करु लागले. लोकांना सुधारणावादी विचार जवळचे वाटु लागले. समाजामध्ये परिवर्तनाची गरज आहे. असे लोकांना वाटु लागले तयामुळे सामाजिक चळवळी निर्माणा झ ाल्या. ब्रिटिशांनी सामाजिक चळवळीला विरोध केला नाही. ब्रिटिश सामाजिक चळवळीच्या दृष्टिने अनुकुल होते. त्यांनी समाजात परिर्वतन करण्यासाठी प्रयत्न केले. परंतु त्यांचा राजकिय चळवळीला विरोध होता. आपली सत्ता लोक हिरावुन घेतील, आपल्या सत्तेला लोक आव्हान करतील असे त्यांना वाटत होते. समाजात परिवर्तन होत असते. समाजात परिर्वतन घडुन येण्यासाठी काही कारणे जबाबदार असतात.व्यक्ती व समुहाव्दारे सामाजिक परिर्वन घडुन येत असते. सामाजिक चळवळ म्हणजे समाजातील बहुसंख्य लोकांकडून समाजाच्या काही महत्वाच्या घटकात बदल घडवून आणण्याचा अगर त्यात होणाऱ्या बदलांना विरोध करण्याचा संघटीतपणे केलेला प्रयत्न होय. **ही संकल्पना सर्वप्रथम सेट सायमन या फ्रेंच विचारवंताने वापरली.** सामाजिक चळवळी या संघटीत हेतुपुरस्कृत वसाततत्यपूर्ण असतात.

Smt. Sindhutai Jadhav Maha. Mehkar 330



Scanned by TapScanner

व्याख्या

१) **टर्नर व किलियन** , 'समाजात घडून येणाऱ्या परिवर्तनाला सहाय्य किंवा विरोध करण्यसाठी समाज सदस्य जेंव्हा सातत्यपूर्ण प्रयत्न करतात तेव्हा अशा प्रयत्नांना सामाजिक चळवळ असे म्हणतात.'

२) **अॅण्डरसन व पार्कर** , 'ज्यांचा उद्देश समाजव्यवस्थेच्या एखाद्या भागात अगर संपूर्ण समाजव्यवस्थेत बदल करणेआणि काळानुरुप संरचनेचा विकास करणे हा असतो अशा समाजातील बहुसंख्याकांच्या वर्तनाला सामाजिक चळवळी असे म्हणतात.

३) **रुडॉल्फ हर्बली** , 'एखाद्या समाजात सामूहिक प्रयत्नांव्दारे प्रस्थापित संबंधात बदल घडवून आणणे म्हणजे सामाजिक चळवळ होय.'

४) **ब्लूमर हर्बट** , 'सामाजिक जीवनात नवसमाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी केले गेलेले सामूहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय.'

५) **लुंडबर्ग** , 'व्यापक समाजातील दृष्टिकोन, वर्तन व सामाजिक संबंध या संदर्भात घटकांत बदल घडवून आणण्यासाठी लोकांचे झालेले उत्स्फूर्त संघटन म्हणजे सामाजिक चळवळ होय.'

**सामाजिक चळवळीचे वैशिष्टये**

१) **सामुहिक प्रयत्न:** सामाजिक चळवळ निर्माण होण्यासाठी सामुहिक प्रयत्नाची गरज असते.जेव्हा काही लोक प्रयत्न करतात तेंव्हा ती एक समस्या असते. या समस्येचे स्वरूप व्यापक होते तेव्हा असंख्य लोक त्या प्रश्नाशी संबंधीत विषयावर मार्ग काढण्यासाठी तयार होतात तेव्हा सामाजिक चळवळ निर्माण होते. उदा. अण्णा हजारे यांची भ्रष्टाचार विरोधी चळवळ सामुहिक प्रयत्नातून निर्माण झाली आहे.

२) **व्याप्तीचे कार्यक्षेत्र :-** सामाजिक चळवळीची व्याप्ती वेगवेगळय क्षेत्राशी संबंधी असते. उदा. धरणग्रस्ताची चळवळ त्या शेत जमिनीशी संबंधीत असते. तसेच काही चळवळी व्यापक स्वरूपाच्या असतात. उदा. शेतकरी चळवळ, कामगार चळवळ, स्त्रिवादी चळवळ, विद्यार्थी चळवळ, पर्यावरण चळवळ इत्यादी चळवळीचे क्षेत्र व्यापक स्वरूपाचे असते.

३) **शांततापूर्ण किंवा हिंसात्मक मार्ग :-** समाजातील बहूतांश चळवळी शांततेच्या मार्गने कार्य करीत असतात. या चळवळी लोकशाही मार्गाने आपल्या मागण्या मान्य करून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. या उलट काही चळवळी हिंसात्मक मार्गाचा अवलंब करतात. या चळवळीतील लोकांचा लोकशाही मार्गावर विश्वास नसतो. उदा. नक्षलवादी चळवळ,दहशतवादी चळवळ इत्यादी .

४) **संघटीत व असंघटीत स्वरूप :-** सामाजिक चळवळीचे स्वरूप हे संघटीत व असंघटीत आशा दोन्ही प्रकारचे असते. बहूतांश चळवळी संघटीत स्वरूपाच्या असतात. सुरूवातीला लोक मोठया प्रमाणात संघटीत असतात. चळवळीला



330
Scanned by TapScanner

लागणारा बराचसा वेळ यामुळे संघटना टिकून राहत नाही. तसेच काही चळवळी असंघटीत स्वरूपाच्या असतात. या चळवळीत जास्त व्यक्तीची गरज नसते. काही लोक या चळवळी निर्माण करतात. उदा.मिडीयाच्या आधारे ही चळवळ केली जाते.

५) **अनिश्चित कालावधी :-** चळवळीचा कोणताही कालावधी निश्चित नसतो. चळवळ कोणत्यातरी उददे्शाने निर्माण झालेली असते. उददे्श पुर्ण झाल्यास चळवळ संपुष्टात येते. तर काही चळवळीचा उददे्श पुर्ण होत नाही. तेंव्हा अशा चळवळी अनिश्चित कालावधीसाठी सतत कार्य करीत असतात. त्यामुळे या चळवळी दिर्घकाळ चालतात. चळवळ निर्माण करणारा व्यक्ती देखिल एखाद्या प्रश्नावर संघटेन निर्माण केल्यानंतर हे संघटन किती दिवस टिकणार आहे. हे ठरवु शकत नाही. त्याची इच्छा जास्त काळ संघटन टिकवुन ठेवण्याची असली तरी देखिल बऱ्याच वेळा संघटन नष्ट होते. तर कधी कधी नेता बदलानंतर संघटन मजबुत होते. या पध्दतीने चळवळीचा कालावधी अनिश्‍चित असतो.

६) **लक्ष किंवा उद्दिष्टये :-** प्रत्येक सामाजिक चळवळीचे काही उद्दि्ष्टये असते. हे उद्दिष्टये प्राप्त करण्यासाठी लोक एकत्र आलेले असतात. संघटनेचे नेतृत्त्च व सदस्य यांना कोणते तरी उदिष्टये साध्य करायचे असते. त्यांचे काही हितसंबध असतात. आपल्या हितसंबंधाची पुर्तता होईपर्यत हे लोक कार्य करित असतात. अशा पध्दतीचे लक्ष किंवा उद्दिष्टये प्रत्येक चळवळीत असते.

७) **सामाजिक परिवर्तनाचा प्रकार -:** सामाजिक चळवळी सामुहिक प्रयत्नातून निर्माण होतात. समाजात काही प्रश्नावर लोकांचे जनमत तयार झालेले असते. त्या आधारे ते परिवर्तन करण्याचा प्रयत्न करतात तर काही लोक परिवर्तनाला विरोध करतात. या अर्थाने सामाजिक चळवळी दोन्ही प्रकारच्या असतात. सामाजिक चळवळीव्दारे समाजात बदल घडुन येत असतो. हा बदल सकारात्मक किंवा नकारात्मक स्वरुपाचा असतो. हा बदल होण्यासाठी समाजातील लोक कोणत्या चळवळी करतात ते लक्षात घ्यावे लागते. लोकांना कोणत्या प्रकारचे परिवर्तन अपेक्षित आहे. हे चळवळीवरुन लक्षात येते.

८) **नवकल्पना प्रमाणके, मूल्यांचा संच :-** सामाजिक चळवळीमुळे नव्या कल्पना, प्रमाणके,मूल्यांचा संच निर्माण होतो. सामाजिक चळवळ नष्ट झाली तरी ही सामाजिक चळवळीने निर्माण केलेली मूल्ये समाजात टिकून असतात. समाजात चळवळीमुळे नव कल्पना निर्माण होतात. सामाजिक चळवळीतील लोक समाजात दिशा देण्याचे प्रयत्न करित असतात. आदर्श व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करित असतात. या पध्दतीच्या नविन कल्पना त्यांच्याकडे असतात. या कल्पनेच्या बळावर ते संघटन मजबुत करित असतात. व नविन मुल्यव्यवस्था निर्माण करित असतात.

**सामाजिक चळवळीच्या अवस्था**

१) **प्राथमिक अवस्था :-** या अवस्थेला अस्वस्थावस्था असे ही संबोधले जाते. या अवस्थेत लोकांमध्ये काही प्रमाणात गोंधळ किंवा असमाधान आढळते. म्हणून ते अस्वस्थ असतात. **स्मेलसर** यांच्या मते, प्रस्थापित



Scanned by TapScanner

समाजव्यवस्थेविषयी असंतुष्टतेच्या भावनेतून सर्व सामाजिक चळवळी निर्माण होतात. सामाजिक सबंधात निर्माण होणरी अस्वस्थता हा समाजव्यवस्थेतील वस्तुस्थितो व आदर्श यामधील अंतराचा परिपाक असतो. समाजसदस्यांना समाजव्यस्थेबाबत पूर्ण समाधान वाटत असेल तर सामाजिक चळवळी उगम पावत नाहीत. याउलट समाज सदस्यांत असणारी अस्वस्थता हेच सामाजिक चळवळीच्या उगमाचे बीज ठरते. पण समाज सदस्यांत आढळणारी अस्वस्थता, असमाधान वंचिततेची भावना व्यापक असेल तर सामाजिक चळवळी उदयास येतीलच असे नाही तर ही वंचितता मानवनिर्मित असुन सामूहिक प्रयत्नांव्दारे ती हाताळता येणे शक्य आहे असा लोकांचा विश्वास असतो किंवा असा विश्वास ठेवण्यास भाग पाडले जाते तेव्हाच सामाजिक चळवळी उदयास येतात.

२) **लोकप्रिय अवस्था :-** या अवस्थेत आपल्यातील वंचिततेची भावना कमी करु शकेल असा लोकांना विश्वास वाटणाऱ्या नेवृत्वा भोवती सामाजिक चळवळ केंद्रित होऊ लागते. असे नेतृत्व दैवीगुण असणारे असु शकेल की, जे या चळवळीला नेतृत्व देऊ शकेल. आपल्या वंचिततेच्या समस्येवर सुधारणा, क्रांती, विरोध यापैकी कोणत्यातरी मार्गाने नेता उत्तर शोधू शकेल असे वाटू लागते. अशा नेत्याभोवती लोक एकत्र येतात हा नेता अनुयायाना काही आव्हान करत असतो व लोक प्रतिसाद देत असतात. यातुन संघटन मजबुत बनत असते. यामध्ये लोक आपल्या पध्दतीने योगदान देत असतात. वेगवेगळया जबाबदाऱ्या लोक विभागुण घेत असतात. चळवळीत कार्याचे विभाजण झालेले असते. त्यामुळे प्रश्न कसा हाताळायचा हे निश्चित केले जाते व योग्य दिशेने कामकाज केले जाते. त्यामुळे लोकांचा विश्वास वाढत जातो व संघटन अधिक मजबुत होत जाते.

३) **औपचारिक संघटनावस्था :-** या अवस्थेत सामाजिक चळवळी विषयी संघटन, डावपेच व कार्यक्रम पध्दती विकसित केली जाते. या अवस्थेत निर्माण झालेली वंचिततेची भावना संपुष्टात आणण्यासाठी पर्यायी दृष्टिकोन, विचारसरणी लोकांच्या समोर मांडली जाते. एकदा ही विचारसरणी अनुयायांनी स्वकारली की तिचे कार्यक्रमात रुपांतर केले जाते. खऱ्या अर्थाने सामाजिक चळवळ यातून सुरु होते असे म्हणता येईल.

४) **संस्थागत अवस्था :-** जेव्हा सामाजिक चळवळ यशस्वी होते तेव्हा तिला ही अवस्था प्राप्त होते. या अवस्थेत ती सामूहिक कृती ठरत नाही. कारण ही संघटीत होते. समाजातील प्रस्थापित मूल्यव्यवस्था स्वीकरली जाते. आणि असे गृहीत धरले जाते की, समाजात भावी कळात अपेक्षित बदल घडून येईल. परिणामी आपल्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची गरज उरलेली नाही असा विश्वास अनुयायात निर्माण होतो आणि सामाजिक चळवळीला संस्थागत अवस्था प्राप्त होते.

५) **विनाशावस्था :-** हार्टन व हंट यांनी या अवस्थेचा पुरस्कार केला आहे. जेव्हा चळवळ ही चिरकाल संघटन बनते ( उदा. भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस ) तेव्हा ती विनाशावस्थेत पोहोचते. त्यानंतर एक चळवळ म्हणून तिचे अस्तित्व निस्तेज होते. तिच्या घसरणीला सुरुवात होते. लोकांचा एकत्र येण्याचा उद्देश पूर्ण झाल्यानंतर लोकांच्या मनातील तिव्रता कमी झाल्यानंतर चळवळीला उतरती कळा लागते. चळवळ नामशेष व्हायला लागते. लोकांना संघटित



330

74

राहण्याची गरज वाटत नाही. ही अवस्था प्रत्येक चळवळीला कधी ना कधी प्राप्त होत असते. ही अवस्था प्राप्त होण्याला अनेक कारणे जबाबदार असतात. कधी प्रश्न सुटलेला असतो तर कधी नेतुत्व बदल झालेला असतो तर कधी अशी परिस्थिती निर्माण झालेली असते की त्या ठिकाणी त्यापेक्षा एखादा दुसरा प्रश्न महत्वाचा असतो.

**सामाजिक चळवळीचे प्रकार**

१) **सुधारणा चळवळी :-** सुधारणा चळवळी प्रस्थापित समाज व्यवस्थेविषयी पूर्ण समाधानी नसतात. या चळवळीचा असा विश्वास असतो की, समाजव्यवस्थेच्या विशिष्ट विभागात सुधारणा घडवून आणणे गरजेचे आहे. समाजव्यवस्थेच्या विशिष्ट विभागात सुधारणा घडवून ती समाजव्यवस्था बहुसंख्य लोकांना सुसहाय्य करण्याच्या उद्देशाने या चळवळी सुरु होतात. या चळवळी विरोधी स्वरुपाच्या असतात. या चळवळींना समाजात बदल अपेक्षित असतो. या चळवळीव्दारे समाजातील काही प्रश्नाच्या बाबतीत नविन धोरणाचा स्विकार केला जातो. समाजात सुधारणा घडवुन आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. समाजाची पुर्नरचना निर्माण करणे, समाजाची पुर्नबांधणी करणे या चळवळीचा मुख्य उद्देश असतो. उदा. स्त्री-मुक्ती चळवळ, पर्यावरण संरक्षण चळवळ, दलित चळवळ सत्यशोधक चळवळ इ. सुधारणवादी चळवळी आहेत.

२) **क्रांतीकारी चळवळी :-** विरोधी चळवळीचे रुपांतर क्रांतीकारी चळवळीमध्ये होत असते. जेंव्हा समाजातील मोठया वर्गाकडे दुर्लक्ष केले जाते त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जाते. तेंव्हा क्रांतीकारी चळवळीचा उदय होतो. यावेळी लोकांच्या मनात बदल घडवुन आणण्यासाठी क्रांती हाच एक मार्ग आहे असे वाटते. जेंव्हा लोक संघटीपणे प्रयत्न करतात तेंव्हा क्रांतीकारी चळवळी यशस्वी होतात. क्रांतीकारी चळवळी या प्रस्थापित समाज व्यवस्थेविषयी पूर्णपणे असमाधानी असतात आणि त्यात क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणण्यासाठी कार्यरत होतात. प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या जागी आपल्या विचारसरणीप्रमाणे नवसमाजव्यवस्था अस्तित्वात आणून समाजाचे पुर्नसंघटन करणे हाच त्यांचा मुख्य उद्देश असतो. जरी काही क्रांतीकारी चळवळी आपल्या उद्देशपूर्तसाठी हिंसात्मक मार्गाचा अवलंब करत असल्या तरी बहुसंख्य क्रांतीकारी चळवळी हिंसात्मक मार्गाचा अवलंब करण्यास उत्सुक नसतात. उदा. भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ, समाजवादी चळवळ, वर्ण भेदाविरुध्दची चळवळ, रशिया, चिन फ्रांस या देशातील चळवळी क्रांतीकारी स्वरुपाच्या होत्या.

३) **प्रतिगामी किंवा पुनरुज्जीवनवादी चळवळ :-** काही चळवळी प्रतिगामी चळवळी म्हणून ओळखल्या जातात. या चळवळीचा परिवर्तनाचे चक्र उलटया दिशेने फिरवणे हा मुख्य उद्देश असतो. या चळवळीचे अनुयायी समाजातील परिवर्तनाकडे साशंकतेने पाहतात आणि परीवर्तनाला विरोध करुन पूर्ववत स्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. हे परंपरागत मूल्ये विचारप्रणाली व संस्थात्मक संरचना यांचे महत्व व मोठेपण मांडण्याचा प्रयत्न करतात आणि त्याचवेळी वर्तमानकाळात जलद गतीने होणाऱ्या परिवर्तनावर कडाडून टीका करतात. उदा. राष्ट्रीय स्वयंसेवक

330



75

Scanned by TapScanner

संघाची हिंदू धर्माच्या पुनरुज्जीवनासाठीची चळवळ सामाजिक चळवळीच्या वरील तीन महत्वपूर्ण प्रकाराबरोबरच हॉटन व हंट यांनी सुचविलेले आणखी दोन प्रकार विचारात घ्यावे लागतील.

४) **प्रतिकार चळवळी :-** समाजात होत असणाऱ्या परिवर्तनाला विरोध करण्यासाठी या चळवळी अस्तित्वात येतात. बहुसंख्य भारतीयात आपली परंपरागत मूल्ये, राष्ट्रीय सदगुण व सांस्कृतिक महानता या बाबी समाजावद नैतिक अधःपतन, अल्पसंख्याकांचा अनुनय, राजकीय भष्टाचार यासारख्या कारणांमुळे नष्ट होत आहे अशी भावना अलीकडील परिवर्तनामूळे निर्माण होत आहे. परिणाम कित्येक प्रतिकार चळवळी या राष्ट्रीय परिवर्तनाच्या दिशेविषयी असमाधान व्यक्त करत आहेत. उदा गर्भपातविरोधी चळवळ, हिंदी भाषाविरोधी चळवळ, राखीव जागाविरोधी चळवळ, आर्थिक उदात्तीकरणाविरुध्दची स्वदेशी चळवळ इत्यादी चळवळी क्रांतीकारी स्वरुपाच्या नसुन प्रामुख्याने प्रतिकारी स्वरुपाच्या असतात.

५) **आंदर्शवादी चळवळी :-** या चळवळी म्हणजे संपूर्ण समाज किंवा समाजातील एखादा विभाग यांना पूर्णावस्था प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न होय. आदर्शवादी चळवळ म्हणजे अशी चळवळ की, ज्याव्दारे परिपूर्ण समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातात. अर्थात अशी परिपूर्णता ही वस्तुस्थिती नव्हे तर मानवी कल्पनाशक्तीत आढळते. १९ व्या शतकात रॉबर्ट ओवेन व चार्ल फ्रॉऊरीअर हे या चळवळींचे समर्थक होते. अशा चळवळी मानव हा मूलतः चांगला सहकार्य करणारा व परहित पाहणारा आहे या गृहीतकावर आधारलेल्या असतात. उदा. भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय स्वयंसवेक संघ यांची रामराज्याची संकल्पना, हरे राम हरे कृष्ण चळवळ ,कम्युनिस्टांची वर्गविरहित समाजाच्या निर्मितीची चळवळ इत्यादी. सामाजिक चळवळीच्या या प्रकाराबरोबरच पुढील आणखी दोन प्रकारांचा विचार करावा लागतो.

६) **स्थलांतर चळवळ :-** जेंव्हा असंख्य लोक एका प्रदेशाचा त्याग करुन दुसऱ्या प्रदेशात वास्तव्य करतात तेव्हा स्थलांतर चळवळ अस्तित्वात येते. प्रस्थापित व्यवस्थेविषयी असणारे असमाधान किंवा उज्जवल भविष्याची आकांक्षा हे अशा स्थलांतराचे महत्वाचे कारण असते. केवळ लोकांचे एका ठिकाणाहून दुसरीकडे होणारे स्थलांतर म्हणजे स्थलांतर चळवळी नव्हे पण जेव्हा बहुसंख्य लोकात प्राप्त परिस्थितीविषयी समाधान असमाधानाची भावना, उज्जवल भविष्याविषयी समान विचार असतात आणि सर्वजण दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करण्याचा सामुहिक निर्णय घेतात तेव्हा स्थलांतर चळवळी अस्तित्वात येतात. उदा. ज्यू लोकांचे इस्त्रायलकडे झालेले स्थलांतर, पूर्वजर्मनीचे पश्चिम जर्मनीत झालेले स्थलांतर, बांग्लादेशातील निर्वासितांचे भारतात झालेले स्थलांतर इ.

७) **अभिव्यक्ती चळवळी :-** जेंव्हा लोकांना अन्यायकारक वाटणाऱ्या प्रस्थापित समाजव्यवस्थेपासून स्वतंत्र होता येत नाही किंवा समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यात आपण पूर्णपणे असमर्थ आहेत असे वाटू लागते तेव्हा अभिव्यक्ती चळवळी अस्तित्वात येतात. अशा चळवळीत प्राप्त समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करण्याऐवजी स्वतःमध्येच प्राप्त परिस्थितीप्रमाणे बदल घडवून आणण्याचा प्रयत्न व्यक्तीकडून केला जातो. अशा



330



Scanned by TapScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

प्रकारे लोक आपले जीवन सुसहाय्य करण्याचा प्रयत्न करतात. व्यक्ती दुःखदायक वर्तमानकाळ विसरुन सुखकारक भविष्याच्या कल्पनेत स्वतःला रममान करु लागते. उदा. हिप्पी चळवळ.

**सामाजिक चळवळी व सामाजिक परिवर्तन**

सामाजिक चळवळी या सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे आश्वासन देतात. तसेच अशा प्रकारचे सामाजिक परिर्तन घडवून आणतात. पण ही एक मार्गी प्रक्रिया नाही. कारण सामाजिक चळवळी केवळ सामाजिक परिवर्तन घडवून आणतात असे नाही तर सामाजिक परिवर्तनामुळे काही वेळा सामाजिक चळवळीच्या उगमाला योग्य पर्श्वभूमी तयार होते. समाजिक परिवर्तन सामाजिक चळवळीला जन्म देते आणि पर्यायाने सामाजिक चळवळीमुळे सामाजिक परिवर्तनात वाढ होते. स्मेल्सरने तर सामाजिक चळवळ म्हणजे सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणण्यासाठीचे संघटित सामूहिक प्रयत्न म्हटले आहे.

जवळजवळ प्रत्येक सामाजिक चळवळीला विरोध करणारी प्रतिकार चळवळ अस्तित्वात असते. सामजिक चळवळीला विरोध करणे हाच या प्रतिकार चळवळीचा प्रमुख हेतू असतो. प्रतिकार चळवळी प्रस्थापित समाजव्यवस्थ टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. उदा. काही राजकीय पक्ष, संघटना व नेत्यांनी राखीव जागासाठी चळवळ सुरु केली तर इतर काही जणांनी राखीव जागांविरोधी चळवळ सुरु केली. त्याचप्रमाणे कित्येक नेते, संघटना व राजकीय पक्षांनी अयोध्येतील वादग्रस्त ठिकाणी राममंदिर बांधण्यासाठीच्या चळवळीला पाठिंबा दिला तर इतर कित्येक नेत्यांनी, राजकीय पक्षांनी त्याचवेळी राममंदीर विरोधी प्रतिकार चळवळ सुरु केली.

समाज कधीही स्थिर असत नाही. सामाजिक चळवळी व प्रतिकार दोन्ही समाजाला आपल्या दिशेने आकर्षित करुन घेत असतात. जेंव्हा सामाजिक चळवळीच्या बाजुने जनमताचा रेटा प्रचंड प्रमाणात वाढतो तेव्हा प्रतिकार चळवळीचा विरोध मोडून सामाजिक चळवळी यशस्वी होतात आणि शेवटी समाजव्यवस्थेचा एक घटक बनतात. पर्यायाने सामाजिक चळवळीला अनुरुप असे परिवर्तन घडून येते.

थोडक्यात सामाजिक चळवळ सामाजिक परिवर्तन यामध्ये असणारे आंतरीक संबंध स्पष्टपणे लक्षात येत नाहीत. सामाजिक परिवर्तन व सामाजिक चळवळी यांच्यां आंतरसंबंधाबाबत आपण पुष्कळ बाबी जाणून घेऊ शकत नाही. पण हे निश्चित आहे की, सामाजिक चळवळी व सामाजिक परिवर्तन या दोन्ही बाबी परस्परसंबंधित व परस्परावलंबी आहेत.सामाजिक चळवळी अधिक संघटित असतात. कोणत्या तरी उद्देशाने चळवळी निर्माण होत असतात. चळवळीत सहभागी झालेले लोक उत्स्फूर्तपणे सहभागी झालेले असतात. त्यांच्या मनात काही प्रश्न असतात. ते प्रश्न सोडविण्यासाठी हे लोक एकत्र आलेले असतात सामाजिक चळवळीला कोणत्याही संघटनेची गरज नसते. लोक एखाद्या प्रश्नावर एकत्र येतात. त्यानंतर संघटन तयार होत असते. औद्योगिक समाजात सामाजिक चळवळी जास्त प्रमाणात आढळुन येतात. लोकशाही समाजव्यवस्थेत सामाजिक चळवळीचे प्रमाण जास्त असते. कारण लोकशाहीत व औद्योगिक समाजात हितसंबंधी गट असतात. हे गट समाजातील लोकांना संघटित करित असतात. व्यवस्थेला विरोध करित असतात. हुकुमशाही राज्यव्यवस्थेत सामाजिक चळवळी दडपण्याचा प्रयत्न

केला जातो. सामाजिक चळवळी नष्ट केल्या जातात. असे असले तरी देखिल. हुकुमशाहोला विरोध करण्यासाठी लोक एकत्र येतात. व व्यवस्थेला उलथुन टाकण्याचा प्रयत्न करतात. लोकशाहीत मात्र सामाजिक चळव्वळील प्रोत्साहन दिले जाते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. डॉ. प्रदिप आगलावे -समाजशास्त्राचा परिचय, साईनाथ प्रकाशन नागपूर
२. डॉ. रा. ज. लोटे - समाजशास्त्राचा परिचय, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर
३. डॉ. माणिक माने - समाजशास्त्राचा परिचय, फडके प्रकाशन. कोल्हापूर

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana

330



Scanned by TapScanner